# महाराष्ट्र शासन

## साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ०५

फोन नं. - २५५३८०४१ ई-मेल :

commsugaradm.@gmail.com , www mahasugarcom.gov.in

जा.क्र. सा.आ.प्रशासन/पुरवठादार नोंदणी/सहभाग/अटी/५५७ /२०१२, दि१०/१०/२०१२

---

## परिपत्रक

**विषय :- सहकारी साखर कारखान्यांना लागणाऱ्या विविध प्रकारच्या मशिनरी व त्यांचे सूटे भाग पूरविणाऱ्या पूरठादारांच्या नोंदणीबाबत**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यामध्ये वेगवेगळया कामांसाठी विविध प्रकारची दर्जेदार व खात्रीशीर कार्यक्षमतेची यंत्रसामुग्री खरेदी करावी लागते. कारखान्यात खरेदी करावी लागणारी यंत्रसामुग्री योग्य दर्जाची आणि योग्य किंमतीची असणे आवश्यक आहे. या बाबत खरेदी केली जाणारी मशिनरी राष्ट्रीय सहकारी विकास निगम , राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (साखर विभाग) यांचेकडील पत्र दि. १९/०८/१९९९ च्या पत्रानुसार ८ प्रकारची क्रिटीकल मशिनरी ही त्यांचे मार्फत नोंदणी केलेल्या पूरवठादारांकडूनच घेतली पाहीजे. या क्रिटीकल मशिनरी व्यतीरीक्त सर्व मशिनरी सहकारी साखर कारखान्यांना खरेदी करावयाचे झाल्यास राज्य पातळीवरील समितीची मान्यता घेतलेल्या पूरवठादारांकडून त्यांची खरेदी करणे आवश्यक आहे.

सहकारी साखर कारखान्यांकडून ब-याच वेळी पुरवठादाकडून दर्जेदार आणि विहीत मुदतीमध्ये मशिनरींचा पुरवठा न केल्याबाबतची तक्रार साखर आयुक्त कार्यालयास प्राप्त होते. अश्या प्रकरणामध्ये वेळेत कामकाज पूर्ण होत नसल्यामुळे प्रकल्प खर्चामध्ये वाढ होउन कारखान्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. सदर बाबत या कार्यालयाकडे लवाद दावे दाखल होउन प्रकल्प उभारणीमध्ये अनावश्यक विलंब होतो. यासाठी नोंदणी करताना पुरवठादारांची क्षमता, अर्थक्षमता, तांत्रिक ज्ञान, त्यांच्याकडे उपलब्ध असणारी यंत्रसामग्री, तांत्रीक ज्ञान असणारे अनुभवी मनुष्यबळ, त्यांनी इतर ठिकाणी पुरवठा केलेल्या यंत्रांची कार्यक्षमता, नविन तांत्रिक संकल्पना इत्यादी आर्थिक , तांत्रिक व कायदेशिर बाबींचा विचार करुन पूरवठादारांना नोंदणीकृत करणेसाठी साखर आयुक्तालयाचे स्तरावर साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि. ०८/०६/२००९ रोजी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**सदर समितीने मान्यता दिलेल्या पूरवठादारांकडूनच सहकारी साखर कारखान्यांनी यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे. याबाबत सर्व संबंधितांनी आणि कारखान्यांनी खालील नमूद बाबींची खात्री करुनच पूरवठादारांना निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करून घ्यावे.**

१) राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एन.सी.डी.सी.) यांचेकडे कालावधी नमूद न करता एकदाच नोंदणी करणाऱ्या पुरवठादारांच्या मशिनरी पुरवठयाबाबत व फर्मच्या आर्थिक कुवती बाबत खातरजमा करण्यात यावी.

२) साखर आयुक्त कार्यालयाकडून उक्त नमूद समिती गठीत होण्यापूर्वी पूरवठादारांना ठरावीक कालावधी नमूद न करता सहकारी साखर कारखान्याकरीता अधिकृत पुरवठादार म्हणून नोंदणी पत्र देण्यात आलेले आहे. अशा पुरवठादारांच्या बाबतीत त्यांचा पात्रता कालावधी डिसेंबर २०१२ पर्यंतच निर्धारीत करण्यात येत आहे. या सर्व पूरवठादरांची आर्थिक आणि तांत्रिक क्षमता तपासून जानेवारी २०१३

पासून नुतनीकरण बंधनकारक करण्यात येत आहे. सदर कालावधीनंतर अश्या पुरवठादारांच्या मशिनरी पुरवठयाबाबत गठीत समितीकडून नूतनीकरण झाल्यानंतरच त्यांना टेंडर प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल.

३) साखर आयुक्त कार्यालयाकडे बरेच नविन पुरवठादार, मशिनरी पुरवठादार म्हणून नोंदणी होण्याकरीता प्रस्ताव दाखल करतात. त्यासाठी त्यांची अर्थक्षमता,अनुभव आणि त्यांचे मशिनरीचा दर्जा याची शहानिशा करणे आवश्यक आहे. त्यावरुनच त्यांना पूरवठादार म्हणून नोंदणी पत्र देण्यात येईल. त्यामुळे फक्त प्रस्ताव दाखल केला म्हणून नोंदणी प्रमाण पत्र सादर करू न शकणारा पुरवठादार हा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरीता पात्र होणार नाही.पुरवठादारांनी सादर केलेला प्रस्ताव विचाराधीन असल्यासही असे पुरवठादार टेंडर प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास पात्र असणार नाहीत. संबंधित पूरवठादारांकडे Validity Certificate असणे आवश्यक आहे.

४) पुरवठादारास गठीत समितीकडे नोंदणी केलेबाबत देण्यात आलेल्या मुळ पत्रावरून नोंदणी बाबतची खातर जमा करण्यात यावी. नोंदणी पत्रावरील संबंधित पुरवठादाराचा मशिनरी पुरवठा करण्याकरीता पात्र ठरविण्यात आलेला कालावधी तपासण्यात यावा जेणेकरून कालावधी संपुष्टात आलेल्या पुरवठादारांचा सहभाग टाळणे शक्य होईल.

५) उक्त नमूद बाबींची शहानिशा न करता निवीदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचे, तसेच अश्या कार्यपध्दतीमुळे साखर कारखान्याचे आर्थिक नुकसान झाल्याचे किंवा प्रकल्पाचे उभारणीस अनावश्यक विलंब झाल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी संचालकांची /इतरांची (कारखान्याचा कर्मचारी असणा-या इतर कोणत्याही नावाने सेवेत असणा-या जबाबदार अधिका-यासह) व संचालक मंडळाची राहील याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी.

६) उक्त नमूद बाबींचे हेतूपुरस्सरपणे उल्लंघन करणा-या पुरवठादारांविरूध्द साखर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत पुरवठादार नोंदणी समितीच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्यात येईल याची सर्व पुरवठादारांनी नोंद घ्यावी

**साखर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत कार्यवाहीस्तव रवाना -**

१) प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व

त्याना कळविण्यात येते की, उक्त नमूद परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सहकारी साखर कारखान्यांना पाठवून परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कारखान्यांना कळविण्यात यावे.

२) मा. महासंचालक,वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, मांजरी, पुणे

३) मिटकॉन कन्सलटंसी ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे

**प्रत माहितीस्तव सादर**

१) मा. सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२

२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., मुंबई

राज्यस्तरीय खरेदी समितीमार्फत मशिनरी खरेदीबाबतची निवीदा प्रक्रिया राबविण्यात येते.अश्या प्रकरणात वरील परिपत्रकीय सूचनांच्या काटेकोर अंमलबजावणीची आपले स्तरावरून खात्री करण्यात यावी.